(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात
फौजदारी अपील अधिकारिता

वि.अ.या. (फौजदारी) क्र. १९९९/२०१८. ..... मधून उद्भवणारे
फौजदारी अपील क्र. २६४/२०१९

महाराष्ट्र शासन ———————————————— अपीलकर्ता

विरूध्द

सुरेंद्र पुंडलिक गडलिंग आणि इतर ———————— उत्तरवादी

न्यायनिर्णय

संजय किशन कौल, न्यायमूर्ती

१) परवानगी मंजूर.

२) उत्तरवादी/स्थानबध्द व्यक्ति यांनी, अपीलकर्ता/राज्य यांनी बेकायदा कृत्य (हया नंतर 'सदर अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे) च्या कलम ४३(ड) मधील तरतुदींच्या अनुषंगाने नव्वद (९०) दिवसांच्या आत दोषारोप पत्र दाखल करण्यास कसूर केली तसेच सदर अधिनियमाच्या कलम—४३(ड), पोटकलम (२)(ब) च्या परंतुकामध्ये नमूद आवश्यक बाबींची पूर्तता होत नसतांना देखील तपास पूर्ण करण्यासाठी नव्वद (९०) दिवसांचा अधिक कालावधी मिळण्याकरिता अर्ज केला याकारणास्तव नियमित जामीन मिळण्यासाठी मागणी केली आहे. हया दोन कारणांपैकी दुसरे कारण हा

विवादाचा मुद्दा ठरला आहे, कारण, असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, राज्य सरकारचा प्रयत्न हा (आरोपीस)९० दिवसाच्या कालावधीनंतर स्थानबध्द ठेवण्याची कारणे विनिर्दिष्ट करणारा सरकारी अभियोक्ताचा अहवाल असल्याचे दर्शवितो असे म्हणता येणार नाही.

३) दि. ०८.०१.२०१८ रोजी, तुषार रमेश दमगुडे नामक व्यक्तिने पुण्यातील शनिवारवाडा येथे दिनांक ३१.१२.२०१७ रोजी घडलेल्या घटनेची माहिती देण्यासाठी विश्रामबाग पोलिस ठाणे, पुणे यांच्याकडे भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम १५३—अ, ५०५(१)(ब), ११७ आणि ३४ अन्वये प्रथम खबरी अहवाल (एफ. आय. आर) नोंदविला. त्यामध्ये असे अभिकथन करण्यात आले की दिनांक ३१.१२.२०१७ रोजी दुपारी २.०० ते रात्री. १०.०० वाजण्याचे दरम्यान, पुण्यातील शनिवार येथे 'कबीर कला मंच च्या सदस्यांनी 'भीमा कोरेगाव शौर्यदिन प्रेरणा अभियान' हया शीर्षकाखाली एल्गार परीषदेची सभा घेतली, जेथे सी. पी. आय. {कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया} (माओवादी) च्या सभासदांनी कथित प्रक्षोभक घोषणा दिल्या आणि हिंसक साधनांचा वापर करुन, दहशतवादी कृत्ये आणि इतर बेकायदेशीर कारवाया करण्यासाठी कट रचण्याच्या, चिथावणी देण्याच्या आणि अपप्रोत्साहन देण्याच्या हेतूने काही इतर तत्सम कृत्ये केली, ज्यामुळे, (समाजातील) विविध गटांमध्ये शत्रुता वाढण्यास मदत झाली आणि त्याचाच परीपाक म्हणून ०१.०१.२०१८ ह्या दिवशी, भीमा—कोरेगाव या नावाने प्रसिध्द असलेल्या ठिकाणी, म्हणजेच भीमा कोरेगाव या ठिकाणी झालेल्या लढाईचा २०० वा वर्षदिन साजरा करण्यासाठी जमलेल्या लोकांमध्ये हिंसक दंगा उसळला. प्रकरणाच्या तपासादरम्यान, पोलिसांनी असे अभिकथन केले की, आरोपी व्यक्ति, आणि त्यांच्या सोबतच्या इतर आरोपी व्यक्ति हया सी.पी.आय (माओवादी) हया बंदी घातलेल्या संघटनेचे सक्रिय सभासद आहेत आणि त्यांनी हया बंदी घातलेल्या संघटनेकडून मिळालेल्या गुप्त प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि सूचनेवरुन, ३१.१२.२०१७ रोजी जी घटना घडली, ती 'कबीर कला मंच' हया त्या संघटनेच्या आघडीच्या संघटनेच्या माध्यमातून आयोजित केली होती. पुढे असेही अभिकथन करण्यात आले की जी शोध आणि जप्ती मोहीम राबविण्यात आली, त्यामध्ये उत्तरवादी यांच्या ताब्यामध्ये नक्षली वाड.मय, हस्तपत्रक, पत्रे, पत्रव्यवहार, दृक—श्राव्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर साहित्य मिळून आले आणि ते लोकांना चिथावणी देण्यासाठी, हिंसा निर्माण करण्यासाठी आणि

सार्वजनिक शांततेचा भंग करण्यासाठी वापरण्यात आले. असेही अभिकथन करण्यात आले की, सदर उत्तरवादींपैकी काही जण अवैध कृत्यांना पैशाचे पाठबळ पुरविणा—या व्यक्ति आहेत. तसेच, पुढे असेही अभिकथन करण्यात आले की, सुप्रसिध्द शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना माओवादी गुरीला (गनिमी युध्द करणारे सैनिक) वास्तव्यास असलेल्या जंगल भागामध्ये घेऊन जाऊन त्यांची भूमिगत नक्षलींशी भेट घ ाडवून आणून त्यांच्या मनावर त्यांची मते बिंबविण्यात आली व त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. असे अभिकथन करण्यात आले की, हे सर्व प्रयत्न करण्यामागे असा उद्देश होता की अशा प्रकारचे वातावरण निर्माण करायचे जेणेकरुन अल्पसंख्यांक गट हे भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्याविरोधात उभे राहतील आणि देशाचे सार्वभौमत्व, सुरक्षा आणि अखंडत्व यांची बदनामी होण्याच्या आणि त्यांना धक्का पोहोचविण्याच्या उद्देशाने सार्वजनिक अशांतता निर्माण करतील त्यामुळे आणि शांतताप्रिय नागरिकांच्या मनामध्ये दहशत पसरेल. अशा प्रकारच्या तपासाच्या अनुषंगाने आणि सापडलेल्या साहित्याच्या आधारावर भारतीय दंडविधानाच्या कलम १२०—ब अंतर्गत तसेच सदर अधिनियमाच्या कलम १३,१६,१७,१८—ब,२०,३८,३९ आणि ४० अंतर्गतचे गुन्हे दोषारोपांमध्ये नव्याने सामील करण्यात आले.

४) सुरुवातीच्या प्रारंभिक पोलिस कोठडीनंतर, तपास पूर्ण करण्यासाठी, उत्तरवादींच्या, ९० दिवस एवढया कालावधीच्या, न्यायालयीन कोठडीची मागणी करण्यात आली. सदरचा कालावधी हा दिनांक ०३.०९.२०१८ या दिवशी पूर्ण झाला. सदर कालावधी आणखी ९० दिवसांनी वाढवून मिळण्यासाठी, सदर अधिनियमातील कलम ४३—ड. (२)(ब) च्या परंतुकामध्ये नमूद तरतुदीचा वापर करण्यात आला. ती संबंधित तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

"४३—ड. संहितेतील (अधिनियमातील) काही तरतूदींची सुधारित अंमलबजावणी.

XXX XXX XXX XXX

(२) पोटकलम (२) मधील फेरबदलाच्या अधिन राहून संहितेतील कलम १६७ हे सदर अधिनियमाखाली शिक्षापत्र गुन्हा अंतर्भूत असणा—या केसच्या बाबतीत लागू राहील.

XXXX XXXXX XXXX XXXX

(b) सदर परंतुकानंतर, खाली नमूद परंतुक सामील करण्यात येतील, जसे की:—

"यापुढे अशी तरतूद करण्यात येते की, जर सदर ९०(नव्वद) दिवसांच्या कालावधीमध्ये तपास पूर्ण करता येणे शक्य नसेल तर, तपासातील प्रगतीची माहिती आणि सदर नव्वद दिवसांच्या पलीकडे आरोपीची स्थान बध्दता यांची मागणी करण्याची विनिर्दिष्ट करणे नमूद करुन सादर केलेला मा. सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल मा. न्यायालयास पसंत पडला तर न्यायालय सदरचा कालावधी हा पुढील १८० दिवसापर्यंत वाढवून देऊ शकते."

(५) दिनांक ३०.०८.२०१८ रोजी, डॉ. शिवाजी पंडितराव पवार, तपासी अधिकारी (याउपरांत त्यांचा उल्लेख सदर 'आय.ओ' असा करण्यात आला आहे) यांनी जिल्हा सरकारी वकील, शिवाजी नगर यांच्यामार्फत तथाकथित अर्ज सादर केला. त्यामध्ये वेळ वाढवून मिळण्याबाबतची कारणे नमूद केली होती, जसे की न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये साठवलेल्या माहितीच्या तंतोतंत प्रतिमा न मिळणे, मोठया प्रमाणावर गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी अधिक वेळ लागणे, आरोपीचा बॅक तपशील तसेच इतर बाबींचा तपशील न प्राप्त होणे, जप्त करण्यात आलेली कागदपत्रे आणि पत्रव्यवहार यामधील आक्षेपार्ह मजकूराबाबत अधिक चौकशी करणे, निधीबाबतची चौकशी करण्याकरिता अधिक वेळ लागणे तसेच उत्तरवादींव्यतिरिक्त आरोपींबाबत चौकशी करण्याकरिता अधिक वेळ लागणे, इत्यादी. असे दिसते की, तपास पूर्ण करण्यासाठी वेळ वाढवून मिळण्याबाबतचा केलेला अर्ज कायदेशीर आवश्यकतांची पूर्तता करु शकत नाही याची आगोदर जाणीव झाल्याने, त्याच दिवशी दुसरा अर्ज सादर करण्यात आला. अर्जाचे शीर्षक असे सूचविते की सदरचा अर्ज हा महाराष्ट्र शासनाने (सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर यांच्या मार्फत) सादर केला होता. सदर कागदपत्राचे (अर्जाचे) अवलोकन करता असे दिसून येते की, सदरचा अर्ज हा सदर अधिनियमाच्या कलम ४३—ड अंतर्गत दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पूर्ण करण्यासाठी आणि सदर गुन्ह्यामध्ये दोषारोप पत्र सादर करण्यासाठी ९० (नव्वद) दिवसाचा वेळ वाढवून मिळावा यासाठी करण्यात आला होता. त्यासाठीची कारणे ही उपपरिच्छेद (अ) ते (१) मध्ये विस्तृतपण नमूद केलेली आहेत. अर्जाच्या शेवटी असे नमूद करण्यात आले होते की सदरचा अर्ज हा अर्जदाराने सादर

केलेला आहे, तसेच अर्जावर डाव्या बाजूला "श्रीमती उज्वला एस.पवार, जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियाक्ता, पुणे" असे नमूद करुन त्यांनी त्यांची स्वाक्षरी त्याठिकाणी केलेली आहे.

६) दिनांक ०२.०९.२०१८ रोजी, विशेष न्यायाधीश आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी अर्जामध्ये नमूद केलेली विनंती मान्य करुन सदर अर्जावर आदेश पारित केले. सदर आदेशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, आरोपी व्यक्ति आणि त्यांचे कायदे विषयक सल्लागार, आय. ओ. (तपासी अधिकारी) आणि डी.जी.पी (पोलिस उपमहासंचालक) हे न्यायालयात उपस्थित होते आणि सरकारी पक्षाच्या वतीने युक्तिवाद सादर करण्यात आला. आरोपीच्या बाबतीत सदर आदेशात असे नमूद करण्यात आले आहे की, "परंतु, आरोपी व्यक्ति आणि त्यांचे कायदेशीर सल्लागार यांनी असे निवेदन सादर केले की त्यांना काहीही सांगण्यातची इच्छा नाही." (सदर आदेशात असेही नमूद करण्यात आले आहे की,) पोलिस ठाणे दैनंदिनीचे अवलोकन करण्यात आले आणि प्रथम दर्शनी असे सांगण्यात आले की इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील विपुल माहितीचा साठा उघडकीस आला असून त्यातील काही माहितीवरुन असे दिसते की, उत्तरवादी हे अभिकथित गुन्हा घडवून आणण्यात गुंतलेले आहेत. असे निदर्शनास आले आहे की, सदरचा अभिलेख न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठविण्यात आला असून त्यांचे उत्तर अपेक्षित आहे. आय. ओ. यांनी गोळा केलेल्या काही कागदपत्रांवरुन असे दिसते की, आरोपी महेश राव हा टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स च्या विद्यार्थ्यांना त्यांची भूमिगत नक्षलवादी यांच्याशी भेट घडवून आणण्यासाठी तसेच त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी माओवादी गुरीलांनी व्यापलेलया जंगलात घेऊन गेला. प्रकरणातील तपास हा प्रगतीपथावर आणि निर्णायक टप्प्यावर असल्यामुळे व तपासामध्ये काही विशिष्ट प्रगती झाल्यामुळे, तपासाचा कालावधी हा ९० (नव्वद) दिवसांच्या पलिकडे, १८० दिवसापर्यंत वाढविण्यात आला.

७) उपरोक्त आदेशास मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. दिनांक २४.१०.२०१८ रोजीच्या विवादीत आदेशाद्वारे, उत्तरवादींच्या युक्तिवादाने मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायमूर्तीचे अनुकूल मत प्राप्त केले कारण, प्रकरणातील अभिलेखाच्या आधारे त्यांनी असा निष्कर्ष मांडला की, असे म्हणता येत नाही की सरकारी अभियोक्ता यांनी त्यांची सारासार बुध्दी वापरली आणि त्यामुळे, सदर

अधिनियमाच्या कलम ४३(ड) मधील उपपरिच्छेद(२) खंड(ब) च्या परंतुकामध्ये नमूद अनिवार्य आवश्यकतेची पूर्तता झाली नाही.

८) सदर आदेशाने व्यथित होऊन, महाराष्ट्र शासनाने प्रस्तुत न्यायालयामध्ये दोन विशेष अनुमति याचिका दाखल केल्या. त्यामध्ये नोटीस जारी करण्यात येऊन सदर आदेशाच्या अंमलबजावणीला दिनांक २९.१०.२०१८ रोजी स्थगिती देण्यात आली.

९) उपरोक्त घटनांच्या सारांशातून, जो एकमेव प्रश्न विचारार्थ समोर येतो तो म्हणजे, दिनांक ३०.

०८.२०१८ रोजी, सदर अधिनियमाच्या कलम ४३—ड(२)(b) च्या परंतुकानुसार सादर करण्यात आलेला अर्ज, ह्या न्यायालयाच्या न्यायनिर्णयांमध्ये सुस्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे, त्या तरतुदींनुसार मांडण्यात आलेल्या सर्वसामान्य प्रमाणांशी तंतोतंत पूर्तता करतो का?

१०) श्री. मुकूल रोहतगी, विद्वान वरिष्ठ कायदे सल्लागार, यांनी राज्य सरकार/अपीलकर्ता यांच्यावतीने बाजू मांडली तर डॉ. ए.एम.सिंघवी, मिस इंदिरा जयसिंग आणि श्री आनंद ग्रोव्हर, वरिष्ठ वकिल यांनी उत्तरवादी यांचे वतीने बाजू मांडली

११) आम्ही, विविध शीर्षाखाली वादविवादाची व्याप्ती मांडत आहोत.

<u>उत्तरवादी यांनी, त्यांची बाजू कधीही न्यायचौकशी न्यायालयासमोर मांडली नाही.</u>

१२) महाराष्ट्र राज्याचे विद्वान वरिष्ठ वकील यांनी असा युक्तिवाद केला की, न्यायचौकशी न्यायालयाच्या आदेश पत्रामधून असे निदर्शनास येते की, उत्तरवादी यांचे वकील आणि उपस्थित उत्तरवादी यांनी न्यायचौकशी न्यायालयासमोर निवेदन सादर करण्यास नकार दिला. असे सादर करण्यात आले की, अशा परिस्थितीमध्ये, उत्तरवादी सादर केलेली रिट याचिका विचारात घ्यावयास नको होती.

१३) दुसरीकडे, उत्तरवादींच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपीलकर्ता यांचे विद्वान वरिष्ठ वकील ज्याप्रमाणे सिध्द करु पाहत आहेत, तेवढे हे प्रकरण साधे नाही. थोडक्यात, असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रस्तुत प्रकरणामध्ये पुरेशी संधी देण्यात आली नव्हती, कारण विशेष. न्यायालयामध्ये अर्ज सादर केल्यानंतर लगेचच दुस—या दिवशी म्हणजे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी

उत्तरवादींची केस सुनावणीसाठी निश्चित करण्यात आली होती. दिनांक ०१.०९.२०१८ रोजी उत्तरवादींना (न्यायालयात) हजर करण्यात आले आणि त्याच दिवशी त्यांना अर्जाच्या प्रती पुरविण्यात आल्या. दिनांक ०१.०९.२०१८ हा दिवस शनिवार असल्याने, सुरुवातीस वकील उपस्थित नसल्याचे सांगण्यात आले. सदरचे प्रकरण (सोमवार) दि. ०३.०९.२०१८ रोजी सुनावणी करीता तहकूब करावे अशी विनंती करण्यात आली जो निर्विवादपणे शेवटचा दिवस होता, परंतु सदरची विनंती फटाळून लावून प्रकारण ०२.०९.२०१८ रोजी सुनावणीसाठी निश्चित करण्यात आले. त्याव्यतिरिक्त, इतरही काही अभिकथन करण्यात आले.

१४) आमच्या मते, उपरोक्त युक्तिवादामुळे फार मोठा परीणाम घडून येणार नाही, कारण, उच्च न्यायालयाने, विवेक बुध्दीने, प्रस्तुत वादाबाबत त्याच्या गुणवत्तेचा विचार करण्याचे ठरविले. अपीलकर्ता/राज्य हे अगदी शेवटच्या क्षणाला विशेष न्यायालयामध्ये अवतीर्ण झाले त्यामुळे सदर न्यायालयासमोर असा देखावा निर्माण झाला की प्रकारणातील वादाशी संबंधीत कार्यवाही पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला गेला. ह्या टप्प्यावर, उच्च न्यायालयाने त्यांच्या प्रकरणाचा गुणवत्तेवर विचार केल्यामुळे, उत्तरवादींना त्यांचे प्रकरण पुढे सादर करण्याबाबतचा लाभ नाकारता येणार नाही.

<u>सादर करण्यात आलेल्या अर्जामध्ये सदर अधिनियमाच्या कलम ४३(ड)(२)(ब) च्या परंतुकामध्ये नमूद केलेल्या आवश्यक घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे का?</u>

१५) सदर अधिनियमाच्या कलम ४३—ड(२)(ब) च्या परंतुकाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर परंतुक योग्य प्रकारे लागू होण्यासाठी काही विशिष्ट आवश्यकतांची पूर्तता होणे गरजेचे आहे त्या आवश्यकता पुढील प्रमाणे:—

(अ) ९० दिवसांच्या कालावधीमध्ये तपास पूर्ण होण्याची शक्यता नसणे.

(ब) सरकारी अभियोक्ता यांनी अहवाल सादर करणे

(क) सदर अहवालामध्ये तपासाबाबतची प्रगती नमूद केलेली असणे आणि ९० दिवसांपेक्षा जास्त

कालावधीसाठी आरोपींना स्थानबध्द करुन ठेवण्याची विनिर्दिष्ट करणे नमूद असणे

(ड) सरकारी अभियोक्ता यांनी सादर केलेल्या अहवालाबाबत मा. न्यायालयाचे समाधान होणे.

१६) आमच्या हातामध्ये असलेल्या प्रकरणामध्ये दाखल असलेला कागदपत्र जो सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल आहे असे म्हटलेले आहे, तो सदर अधिनियमाच्या कलम ४३ड मध्ये नमूद केलेल्या अर्जाच्या स्वरुपामध्ये आहे. सदर कागदपत्रातील मजकूराचे अवलोकन करता असे दिसते की, त्यामध्ये घडलेल्या घटना आणि तपासामध्ये झालेली प्रगती नमूद करण्यात आल्या आहेत. तसेच, घटनांचा परिणाम म्हणून सदरचा प्रसंग घडलेला आहे, त्या देखील सदरचा अहवालामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणांचे अवलोकन करता असे आढळते की, त्यामध्ये सर्व उत्तरवादी हे सी.पीआय (माओवादी) हया बंदी घातलेल्या संघटनेचे सक्रिय सभासद आहेत, असे अभिकथन केलेले आहे. तपासादरम्यान, कागदपत्रे, पेन ड्राईव्ह, सी.डी, डी.व्ही.डी. इत्यादी जप्त करण्यात आले असून, इलेक्ट्रॉनिक अभिलेख न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई, यांच्याकडे त्यांच्या अहवालासाठी पाठविण्यात आले आहेत आणि त्याबाबतचा अहवाल अदयाप येणे बाकी आहे. सदर 'डाटा' (माहिती) खूप मोठया प्रमाणात असून आरोपी व्यक्तिंना निधीचा पुरवठा कसा होतो याबाबत पुढील तपास करणेदेखील आवश्यक आहे, असेही त्यामध्ये नमूद केलेले आहे. तसेच फौजदारी कट अनेक शहरांमधून पसरलेला असून, त्याबाबतीत अजून तपास करण्याची गरज आहे, आणि उत्तरवादींचे आर्थिक तपशीलांबाबत खात्री करुन घ्यावयाची आहे, असेही त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच, उत्तरवादी आणि इतर 'फरारी आणि भूमिगत आरोपी' यांच्यातील दूरध्वनीवरील संभाषण बाबतचा तपास आणि, तसेच तरुण विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न हया बाबी देखील मुदत वाढवून मिळण्यासाठी कारणे म्हणून त्यामध्ये नमूद केल्या आहेत. त्यामध्ये असेही मांडण्यात की, आले आहे की, तपास पूर्ण झाल्यावर. सदर अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये खटला चालविण्यासाठी दोषारोप पत्र दाखल करण्याची परवानगी मागण्यात आली.

१७) सदर अहवालामध्ये नमूद केलेली माहिती, जसे तपास पूर्ण करण्याकरिता कालावधी वाढवून मिळण्यासाठी नमूद केलेली कारणे, सदर परंतुकामध्ये सांगितलेल्या आवश्यकतांची पूर्तता करीत नाहीत हा

उत्तरवादींच्या वतीने सादर करण्यात आलेला युक्तिवाद आम्ही स्वीकारु शकत नाही.

१८) त्रासदायक प्रश्न, तरीही, ज्याचा प्रस्तुत प्रकरणात आम्हास परामर्श घ्यावयाचा आहे, तो म्हणजे सादर केलेला कागदपत्र हा खरोखरीच सरकारी अभियोक्ता यांचा सदर अधिनियमाच्या कलम ४३ड (२)(ब) च्या परंतुकाप्रमाणे सरकारी अभियोक्ता यांनी काय करणे आवश्यक आहे याची पूर्तता करणारा अहवाल आहे किंवा कसे असे म्हणता येईल का हा आहे.

<u>सदर कागदपत्र जो सरकारी अभियोक्ता यांचा तथाकथित अहवाल आहे असे म्हटले आहे, त्याबाबतचे विश्लेषण:</u>

१९) वादाशी संबंधीत वस्तुस्थिती ही स्थूलमानाने वादाचा भाग नाही. वर असा उल्लेख आलेला आहे की, सुरुवातीस, दिनांक ३०.०८.२०१८ रोजी, तपासी अधिकारी यांनी सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत, कारणे विषद करुन, सदर अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने तपास पूर्ण करण्यासाठी नव्वद (९०) दिवसांचा कालावधी वाढवून मिळणेसाठी अर्ज सादर केला होता. अपीलकर्ता यांच्यावतीने बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील श्री. मुकूल रोहतगी यांनी असे म्हणणे सादर केले की, सरकारी वकिल यांनी त्याच दिवशी सदर विषयावर अतिशय विस्तृतपणे त्याचे म्हणणे मांडले असतांना, ज्याला सदर अधिनियमाच्या कलम ४३—ड च्या तरतूदींअंतर्गत सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल म्हणता येईल असा एक वेगळा कागदपत्र सादर केला. त्यातील मजकूराचे बारकाईने वाचन केले असता असे आढळून येते की, सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर हे महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व करीत आहेत, परंतू, विद्वान वरिष्ठ वकील यांच्यामते ते फक्त प्रतिनिधीत्व करणा—यांचे वर्णन आहे. सदरचा कागदपत्र हा पूढील तपास करण्यासाठी नव्वद (९०) दिवसांचा वेळ वाढवून मिळण्यासाठी सदर अधिनियमाच्या कलम ४३—ड अंतर्गत केलेला तथाकथित 'अर्ज' आहे आणि 'अर्ज' हा शब्द वस्तुस्थितीच्या कथनाच्या अगोदर पुन्हा नमूद करण्यात आला आहे. तिसरी वस्तुस्थितीदर्शक बाजू अर्जाच्या १० व्या परिच्छिेदामध्ये मांडण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे "१०. बेकायदा कृत्य (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ च्या कलम ४३(ड) (सिक) मध्ये नमूद केलेल्या तरतूदींनुसार, जर सदर अधिनियमाशी संबंधीत (गुन्हयाचा) तपास ९० दिवसांच्या कालावधीमध्ये पूर्ण झाला नाही, तर <u>तपासी अधिकारी यांच्या अर्ज/अहवालावारून</u> सदर ९०

दिवसांचा कालावधी हा १८० दिवसांपर्यंत वाढविता येऊ शकतो. असे सादर करण्यात येते की, सदर गुन्हयाचा तपास हा प्रगतीपथावर आहे. तपास अदयाप अपूर्ण आहे आणि म्हणून तपासी प्राधिकारी हे खाली नमूद केलेल्या कारणांसाठी पुढील ९० दिवसांचा कालावधी वाढवून मिळण्याकरिता हया माननीय न्यायालयाकडे आलेले आहेत.

कारणे

ए) सर्व आरोपी हे बंदी घातलेल्या संघटनेचे म्हणजेच सी.पी.आय(माओवादी) चे सक्रिय सभासद असून त्यांचा सदर संघटनेशी म्हणजेच सी.पी.आय.(माओवादी) च्या बेकायदेशीर कारवायांशी थेट संबंध आहे.

बी) जप्त करण्यात आलेली उपकरणे, कागदपत्रे, पेन ड्राईव्ह, सी.डी., डी.व्ही.डी., हार्ड डिस्क, सिम कार्डस् आणि इतर इलेक्टॉनिक अभिलेख तपासादरम्यान न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे त्याबाबतच्या अहवालासाठी आणि त्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये साठवून ठेवलेल्या डाटा (माहिती) ची हुबेहुब नक्कल प्राप्त करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत, आणि त्याबाबत न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून प्राप्त होणा—या अहवालाची प्रतिक्षा आहे.(सिक).

सी.) सदर इलेक्ट्रॉनिक अभिलेखामध्ये विपुल माहिती असून, फक्त महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर इतर राज्यांमध्ये आणि संपूर्ण भारत देशामध्ये हया बेकायदेशीर कारवायांची अंमलबजावणी होत आहे का याची खातरजमा करुन घेण्यासाठी त्याची तपासणी होणे गरजेचे आहे.

डी) सदर बंदी घातलेल्या संघटनेकडून करण्यात येणा—या बेकायदेशीर कारवायांचे प्रचालन करण्यासाठी सदर आरोपीकडून वापरण्यात येणारा निधी त्यांना काढून उपलब्ध होतो याचा देखील तपास करणे जरुरीचे आहे.

इ) तपासा दरम्यान असेही निष्पन्न झाले आहे की, आरोपींकडून त्यांनी केलेल्या फौजदारी कटाच्या अनुषंगाने, सदर बंदी घातलेल्या संघटनेच्या बेकायदेशीर कारवाया दिल्ली, मुंबई, नागपूर, गडचिरोली आणि छततीसगढ येथे करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने देखील पुढील तपास पूर्ण होणे. अद्याप

बाकी आहे.

एफ) सर्व आरोपींच्या बॅंक खात्यांच्या तपशीलाची तसेच त्यांनी त्यांच्या खात्यामध्ये केलेल्या व्यवहारांची खात्री करुन घेणे जरुरीचे आहे.

जी) तपासादरम्यान, आरोपींच्या मोबाईल फोनच्या जप्त केलेल्या सी.डी.आर रिपोर्टमधून असे निष्पन्न झाले आहे की, त्यांचा एकमेकाशी, तसेच फरारी आणि भूमिगत आरोपी व्यक्तिंशी संपर्क होता. त्या संपर्का बाबतचा तपास (सिक) अदयाप पूर्ण व्हायचा आहे.

एच) तपासादरम्यान असे निष्पन्न झाले आहे आणि (सिक) की, टाटा इन्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबईच्या विद्यार्थ्यांना आरोपी महेश राव सुरक्षितपणे आणि गुप्तपणे माओवादी गुरीलांनी व्याप्त जंगलामध्ये फरारी, भूमिगत नक्षलवादी यांना भेटण्यासाठी आणि त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी घेऊन गेला होता याबाबतचा तपास प्रगतिपथावर आहे.

आय) आरोपी व्यक्तिंचे स्वत:चे फेसबुक खाते आणि इ—मेल पत्ता आहे. सदर फेसबुक खाते तसेच इ—मेल द्वारे झालेला संपर्क याबाबतचा तपास प्रगतिपथावर आहे.

जे) दिनांक २८.०८.२०१८ रोजी आरोपी नामे पी. वरा वरा राव, वर्नोन गोन्सालवीस, अरुम थॉमस परेरा, तसेच सुधा भारद्वाज आणि गौतम नवलखा यांना अटक केल्यानंतर, सदर आरोपींकडून इलेक्ट्रॉनिक अभिलेखाच्या स्वरुपातील नक्षली साहित्य जप्त करण्यात आले आणि त्या जप्त केलेल्या कागदपत्रांच्या आणि इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा तपास न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे करण्यात येत आहे.

के) सर्व आरोपी हे सी. पी. आय (माओवादी) ह्या बंदी घातलेल्या संघटनेचे सूत्रधार असून ते हिंसाचार करणे, त्याचे समर्थन करणे, त्याचे मार्गदर्शन करणे, तो कमी करणे (सिक) {? त्यास प्रोत्साहन देणे} आणि जनतेने हिंसाचार हाती घ्यावा ह्या हेतूने तसेच भारताचे ऐक्य, एकात्मता, सुरक्षा आणि सार्वभौमत्व यांना धोका पोहोचवण्याच्या हेतूने सार्वजनिक अशांतता निर्माण करण्यासाठी अवैध कृत्ये करण्यामध्ये गुंतलेले आहेत. त्या दृष्टीने करावयाचा तपास अद्याप अपूर्ण आहे.

एल्) तपास पूर्ण झाल्यावर, बेकायदा कृत्य (प्रतिबंध) अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये सर्व

आरोपींविरुध्द खटला चालविण्याकामी मंजूरी प्राप्त करुन दोषारोप पत्र दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्याची आवश्यकता आहे.

(आम्ही महत्व दिलेले मुद्दे)

२०) उपरोक्त परिच्छेदामधील दृढविधान, म्हणजे, असे आहे की, तपासी अधिकारी यांनी अर्ज/अहवाल दाखल केलेला होता आणि तपासी अधिकारी हे तपास पूर्ण करण्याकामी नव्वद (९०) दिवसांचा कालावधी वाढवून मिळण्यासाठी न्यायालयात गेले होते.

२१) पुन्हा एकदा, वर नमूद केलेल्या कागदपत्राच्या परिच्छेद क्रमांक १३ मध्ये, तपासी अधिकारी ह्यांनी न्यायालयात अर्ज केल्याबाबतचे समान विधान नमूद केले आहे.

२२) अपीलकर्ता यांचे विद्वान वरिष्ठ वकील यांनी, तरीही, असा युक्तिवाद केला की, सारांशापेक्षा जॉस्त तो नमुन्याचा भाग होता. त्यांचा असा युक्तिवाद होता की, मर्यादित (थोडा) कालावधी शिल्लक राहिलेला आहे हे ध्यानात घेऊन, सदरचा अर्ज तातडीने सादर करण्यात आला होता, आणि प्रकरणातील घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, त्याकडे तांत्रिकदृष्टीकोनातून न पाहता त्यातील मसुदयाचा विचार करण्यात यावा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जाच्या शेवटी त्यांच्या सह्या केल्या आहेत, आणि, पहिल्या अर्जापेक्षा दुस–या अर्जामध्ये बदल करण्यात आले आहेत. हे पाहता असे दिसते की, जसे युक्तिवाद केल्याप्रमाणे, तेथे सरकारी अभियोक्ता यांच्या सारासार बुध्दिचा वापर झालेला आहे, जी गोष्ट सरकारी अभियोक्ता यांच्याकडून अहवाल सादर करण्यासाठी खरोखर अनिवार्य आहे.

२३) सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल अधिक चांगल्या शब्दांमध्ये तयार करता आला असता किंवा जर अपीलकर्ता हे काही वेळ (दिवस) अगोदर न्यायालयाकडे आले असते तर ते अधिक योग्य ठरले असते, यामध्ये कोणत्याही गंभीर स्वरुपाचे दुमत नाही. सदर अभिकथित त्रुटी, अन्यथा, बाबत अपीलकर्ता यांच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी काही विशिष्ट बाबींचा संदर्भ देऊन, जसे की, अहवाल/अर्ज यामध्ये तपासामध्ये झालेल्या प्रगतीचा उल्लेख, तसेच तपासाबाबतची कागदपत्रे खरोखरीच सरकारी अभियोक्ता यांना सादर केली होती ही बाब, वर उल्लेख केल्याप्रमाणे दोन स्वातंत्र कागदपत्रे दाखल केल्याची घटना,

सरकारी अभियोक्ता यांच्याकडून सारासार बुध्दीचा वापर केलेला आहे हे दर्शवणे. सरकारी अभियोक्ता यांनी सादर केलेल्या नंतरच्या अर्जामध्ये अतिरिक्त कारणे नमूद केलेली असणे, इत्यादी, त्या तेवढया महत्वाच्या नसल्याचे कथन करण्याचा प्रयत्न केला आहे. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, आधीच्या सम दिनांकित अर्जाची छाननी झाल्यानंतरच, सरकारी अभियोक्ता यांनी, यदयापि, अर्जाच्या स्वरुपामध्ये त्यांचा अहवाल सादर केला आहे.

२४) दोन्ही पक्षकारांच्या वतीने उपस्थित राहणा—या वकील महोदयांच्या संचाने, **हितेंद्र विष्णू ठाकूर आणि इतर विरूध्द महाराष्ट्र राज्य सरकार आणि इतर**[1] हया प्रकरणामध्ये दिलेल्या महत्वाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर प्रकरणातील आरोपींना दहशतवादी आणि विघातक कारवाया (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (याउपरांत 'टाडा' असा उल्लेख करण्यात आला आहे) अंतर्गत स्थानबध्द करण्यात आले होते. टाडा मध्ये १९९३ च्या सुधारणा अधिनियम क्रमांक ४३ नुसार दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार इतर गोष्टीसह दोषारोपपत्र दाखल करण्यासाठीचा कालावधी एक वर्षावरुन १८० दिवसांपर्यंत कमी करण्यात आला आहे. आणि कलम २०(४) मध्ये नवीन खंड (बी बी) अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यानुसार, पदनिर्देशित न्यायालयाद्वारे तपास पूर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून देण्याची व सरकारी अभियोक्त्याच्या अहवालावर चलान (दोषारोपत्र) दाखल करण्याची, ज्यानुसार तपासाची प्रगती स्थानबध्दतेकरिता विशिष्ठ कारणे दर्शविणारी, तथापी, जास्तीत जास्त एक वर्षाच्या अनिवार्य कालावधीपर्यंत स्थानबध्दतेच्या आधीन, वाढविण्याची तरतूद आहे. अशाप्रकारे, या प्रकरणातील व आमच्या समक्ष असलेल्या प्रकरणातील फरक केवळ कालावधीचा आहे. जोपर्यंत या प्रकरणाचा व सदर अधिनियमांचा संबंध आहे, तपास पूर्ण करण्याच्या उद्देशाने संबंधित न्यायिक कोठडीचा कालावधी ९०+९० दिवस आहे. **हितेंद्र विष्णू ठाकूर**[2] प्रकरणामध्ये, हया न्यायालयाने खंड (बीबी) मध्ये नमूद केलेल्या मर्यादांचे पालन न केल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल चुकीचा असल्याचा निर्णय दिला होता.

२५) श्री. मुकूल रोहतगी, विद्वान वरिष्ठ वकील यांनी असा युक्तिवाद केला की, त्या प्रकरणामध्ये सरकारी अभियोक्ता यांच्या अहवालाशी संबंधित वस्तुस्थिती आणि प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित

वस्तुस्थिती यांमध्ये फरक आहे. हयाकरिता त्यांनी आमचे लक्ष (त्या सदर प्रकरणातील) न्यायनिर्णयातील परिच्छेद क्रमांक ७३ कडे वेधले, जेथे सदरचा अर्ज पुन्हा उध्दृत करण्यात आला होता. सदरचा अर्ज हा तपासी अधिकारी यांनी शपथपत्राच्या स्वरुपात दाखल केला होता. अर्जाच्या तळाशी, तो तपासी अधिकारी यांनी साक्षांकित केल्याचे दिसत होते, पण, त्या ठिकाणी सरकारी वकील यांनी माझ्या समक्ष ओळख पटविली असे पृष्ठांकन नोंद केले होते. (त्या प्रकरणामध्ये) असे आढळून आले की, पदनिर्देशित न्यायालयाने तपासी अधिकारी यांचा अर्ज हा सरकारी अभियोक्त्याचा अहवाल आहे असे समजण्याची चूक केली होती. तेथे सदर सरकारी अभियोक्ता यांनी सदर शपथपत्र बनविणा—या शपथपत्रकर्त्याची (तपासी अधिका—याची) निव्वळ ओळख पटविली होती आणि अशी ओळख एकटीच, तो अर्ज हा सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल म्हणून समजण्यात यावा याचे समर्थन करु शकलेली नाही. श्री. रोहतगी यांनी, दुस—या बाजूला, आमच्या समोर असलेल्या प्रकरणाबाबत, असा युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला की (प्रस्तुत प्रकरणामध्ये) सरकारी अभियोक्ता यांनी प्रत्यक्षपणे सारासार बुध्दीचा वापर केला होता आणि याबाबतचा पुरावा म्हणजे विशेष न्यायालयासमोर दोन वेगवेगळया प्रकारचे अर्ज आणि वर नमूद केल्याप्रमाणे इतर कारणे सादर करण्यात आली होती.

२६) या उलट, डॉ. ए. एम्. सिंघवी यांनी वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीवर भरवसा ठेवला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, सरकारी अभियोक्त्याने निव्वळ खाली सहया करणे ही पुरेशी बाब नाही आणि प्रत्यक्षात अगोदर सादर करण्यात आलेले कागदपत्र, जे तपासी अधिकारी यांनी सादर केले होते, त्यावर सुध्दा सरकारी अभियोक्ता यांनी सही केलेली होती. अशा प्रकारे, निवेदन, जे सादर करण्यात आले ते म्हणजे, सरकारी अभियोक्ता यांनी, स्वत:च्या सारासार बुध्दीचा स्वतंत्रपणे कोणताही वापर न करता फक्त तपासी अधिकारी यांनी त्यांच्या अर्जामध्ये जे मांडले आहे, त्याचे पृष्ठांकन केले आहे. एवढेच नाही तर, विद्वान वरिष्ठ वकिल यांनी न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेल्या एका आदेशाकडे आमचे लक्ष वेधले आणि असा युक्तिवाद केला की पदनिर्देशित न्यायालयाने देखील प्रश्नांकीत कागदपत्र हे तपास पूर्ण करण्यासाठी वेळ वाढवून मिळावा यासाठी तपासी अधिका—याने अर्ज केला आहे असे मानले आहे. त्याशिवाय असाही युक्तिवाद केला आहे की, तपासी अधिका—याने तपासाचा कालावधी वाढवून

मिळण्याकामी जी कारणे सादर केली ती खात्रीशीर असल्याचे वाटत नाही.

२७) विद्वान वरिष्ठ वकील यांनी एखादे कागदपत्र सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल आहे असे समजण्याकरिता **हितेंद्र विष्णू ठाकूर**[3] हया प्रकरणाच्या न्यायनिर्णयामध्ये ज्या आवश्यकता नमूद केलेल्या आहेत आणि टाडा अधिनियमाच्या कलम २०(४)(बीबी) मध्ये, हया संदर्भात ज्या अनिवार्य आवश्यकता विषद केल्या आहेत त्यापासून अपीलकर्ता पळून जाऊ शकत नाही ही बाब जोर देऊन सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हया संदर्भात त्यांनी वर नमूद न्यायनिर्णयाच्या २३व्या परिच्छेदाकडे निर्देश केला आहे.

२८) उपरोक्त परिच्छेदाच्या अवलोकनावरुन असे दिसते की, हया न्यायालयाने महत्व दिले ते कायदेमंडळाला, त्यांच्या सूज्ञपणाला, ज्यांनी न्यायालयाकडून वेळ वाढवून मिळविण्यासाठी अर्ज करण्याची जबाबदारी एकटया तपासी अधिका–यावर न सोपवता, तपास यंत्रणेला त्यांच्या अर्जाच्या छाननी करीता, प्रथमत: सरकारी अभियोक्ता यांच्याकडे जाण्याचे आणि तपासातील प्रगती, आणि आरोपीच्या पुढील कालावधीसाठी पोलिस कोठडी मागण्याची कारणे याबाबत त्यांचे समाधान करण्याचे आवश्यक केले. तसे झाले नाही तर, पोलिसांच्या लहरीनुसार, अनावश्यकपणे लांबलेल्या तपासाच्या कालावधीमध्ये, आरोपीस अखंडपणे स्थानबध्दतेमध्ये ठेवले जाईल. हया न्यायालयाने हया वस्तुस्थितीलादेखील महत्व दिले आहे की, सरकारी अभियोक्ता हा तपास करणा–या यंत्रणेचा भाग नसून तो एक स्वतंत्र वैधानिक प्राधिकारी आहे आणि, म्हणून, तपास यंत्रणेला तिचा तपास पूर्ण करता येणे सोईचे व्हावे हया दृष्टीने वेळ वाढवून मिळणेसाठी न्यायालयाला अहवाल सादर करण्यापूर्वी, त्याने तपास करणा–या यंत्रणेच्या विनंतीवर स्वतंत्रपणे सारासार बुध्दी वापरुन विचार करण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारे, "तो (सरकारी अभियोक्ता) केवळ एक टपाल कार्यालय किंवा अग्रेषण अभिकर्ता (फॉरवर्डींग एजन्सी) नाही. सरकारी अभियोक्ता हा तपासी अधिका–याने वेळ वाढवून मिळण्यासाठी नमूद केलेल्या कारणांशी सहमत असू शकेल किंवा नसेल आणि असेही मत व्यक्त करु शकतो की तपासामध्ये योग्य तऱ्हेने प्रगती झालेली नाही किंवा तपास पूर्ण करण्यामध्ये अनावश्यक, जाणीवपूर्वक आणि टाळता न येण्याजागा विलंब झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये, तो सदर खंड क्रमांक (बीबी) खाली वेळ वाढवून मिळण्यासाठी न्यायालयासमोर

कोणताही अर्ज करणार नाही."

२९) त्यामुळे, परिच्छेद क्रमांक २३ मध्ये व्यक्त करण्यात आलेले अभीक्षण (ऑब्झरवेशन) पुढे जाऊन असे सांगते की, सरकारी अभियोक्ता हा तपासी अधिका–याने केलेली विनंती (विनंती अर्ज) ही त्याची विनंती/किंवा अर्ज किंवा अहवाल या सोबत जोडू शकतो, परंतु, त्याच्या अहवालावरुन, तो वाचता क्षणीच, असे दिसून यावयास पाहिजे की त्याने सारासार बुध्दीचा वापर केला आहे आणि तो तपासामध्ये झालेल्या प्रगतीबाबत समाधानी आहे आणि त्याने, आवश्यकता भासल्यानुसार, तपास पूर्ण करण्यासाठी, पुढील वेळ वाढवून देण्याबाबतच्या विनंतीवर विचार केलेला आहे. असा अहवाल ही निव्वळ एक औपचारिकता नसून, तो एक अतिशय महत्वाचा अहवाल आहे, कारण त्यामुळे एखादया आरोपीच्या स्वातंत्र्यावर त्याचा परिणाम होणार आहे. वेळ वाढवून मिळण्यासाठी तपासी अधिका–याद्वारे करण्यात येणारी विनंती ही काही सरकारी अभियोक्त्याच्या अहवालाची जागा घेऊ शकत नाही. येथे आमच्या निदर्शनास असे येत आहे की, अतिशय स्पष्टपणे असे मांडण्यात आले आहे की, हा निव्वळ एका नमुन्याचा प्रश्न नाही ज्यामध्ये वेळ वाढवून मिळण्यासाठीची विनंती केली पाहिजे, परंतु, ती एक महत्वाची माहिती आहे, कारण त्यामुळे पदनिर्देशित न्यायालयाला अशा प्रकारे वेळ वाढवून दयावा किंवा नाही यासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी तिची मदत होणार आहे. ती निव्वळ तपासी अधिका–याने मा. न्यायालयाला केलेल्या विनंतीचे सादरीकरण करण्याची आणि न्यायालयासमोर मांडण्याचे उपकरण नाही. एखादया कागदपत्राला अहवाल किंवा अर्ज असे निव्वळ नामाभिधान देण्याने त्याचा काही मोठा परीणाम होतो असे म्हणता येत नाही, पण, ज्यामुळे परीणाम होऊ शकतो असे म्हटले आहे ते म्हणजे सरकारी अभियोक्त्याने, त्याच्या अहवालामध्ये स्वत:च्या सारासार बुध्दीचा वापर न करता आणि आपले समाधान झाले आहे याबाबतचा उल्लेख न करता निव्वळ तपासी अधिका–याच्या अर्ज किंवा विनंतीचा पुनरूच्चार करणे हे होय.

३०) उपरोक्त युक्तिवाद करण्याच्या पध्दतीला विद्वान वरिष्ठ वकील श्री. आनंद ग्रोव्हर आणि मिस. इंदिरा जयसिंग यांनी समर्थन दिले. त्याच प्रमाणे **<u>संजयकुमार केडिया उर्फ संजय केडिया विरुध्द गुप्तवार्ता अधिकारी, अमली पदार्थ नियंत्रण विभाग, आणि इतर</u>**[4] हया प्रकरणामध्ये दिल्या

गेलेल्या न्यायनिर्णयाचा देखील संदर्भ येथे दिलेला आहे.

३१) सदर प्रकरणातील वस्तुस्थितीचा विचार करता, आरोपीस गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ अन्वये अटक करण्यात आली होती आणि त्यास प्रारंभिक १८० दिवसांच्या कालावधी करिता स्थानबध्द करुन ठेवले होते. ह्या प्रकरणातील तक्रार ही वैधानिकरितीने करारनिविष्ट केलेल्या एक वर्षाचा कालावधी समाप्त होण्याच्या केवळ काही कालावधी अगोदर दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल केल्यानंतर जामिन मिळविण्याचा आरोपीचा प्रयत्न यशस्वी झाला नाही आणि त्यानंतर, त्याने सरकारी अभियोक्ता यांनी सादर केलेला {प्रारंभिक स्थानबध्दतेचा कालावधी वाढवून मिळण्याचा} अहवाल महत्वपूर्ण निकषांची पूर्तता करीत नाही ह्या कारणाचा आधार घेऊन त्या अहवालास जोरदारपणे विरोध करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस देखील, अंतिमतः, सर्वोच्च न्यायालयाने **हितेंद्र विष्णू ठाकूर**[5] हया प्रकरणातील निर्णयाचा आधार घेऊन आरोपी हा नियमित जामीन ('डिफॉल्ट बेल') मिळण्यास पात्र असल्याचे मत व्यक्त करुन आरोपीच्या बाजूने निकाल दिला होता.

३२) **संजय केडीया**[6] प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेऊन पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, १८० दिवसांच्या पलीकडे वेळ वाढवून घेण्यासाठी, "कोणती कारणे कारणभूत" ठरली ती देखील उघड करण्याची गरज आहे आणि तशी कोणतीही कारणे प्रस्तुत प्रकरणामध्ये उघड केलेली नाहीत.

३३) वस्तुस्थितीबाबतचे कथन पूर्ण करण्याच्या दृष्टीने, आम्ही असे नमूद करतो की, ह्या प्रकरणामध्ये दोषारोपपत्र दिनांक १५.११.२०१८ रोजी, म्हणजे वाढवून दिलेल्या ९० दिवसांच्या कालावधीमध्ये दाखल करण्यात आले आहे आणि, अशा प्रकारे, उत्तरवादीना सक्षम न्यायालयाकडून जामीन मिळविण्याचा मार्ग खुला आहे, पण, त्यानंतर, उत्तरवादीच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद हा वस्तुस्थितीवर आधारीत होता तो म्हणजे, जर उत्तरवादी नियमित जामीन (डिफॉल्ट बेल) मिळण्यास पात्र आहेत, तर त्यांच्यावर, दोषारोप पत्र दाखल झालेले असल्यामुळे, नियमित जामीन मिळविण्यासाठी, त्याकरिताच्या कष्टप्रद कार्यवाहीमधून जाण्याची सक्ती करण्यात येऊ नये.

३४) वादातील प्रश्नावर आम्ही आमचे सखोल मत प्रदर्शित केले आहे.

३५) सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या अहवाल अर्जामध्ये तपास पूर्ण करण्यासाठी पोलिस कोठडीचा कालावधी ९० दिवसांनी वाढवून मिळावा यासाठी कारणे देणे यात आवश्यक काही गोष्टी सुटून गेल्या आहेत यामध्ये कोणतीही शंका नाही. न्यायचौकशी न्यायालयासमोर सादर करण्यात आलेले पहिले कागदपत्र म्हणजे तपासी अधिका—याने सादर केलेला अर्ज/अहवाल, जरी त्यामध्ये सरकारी अभियोक्ता यांची फक्त सहीच आहे असे नमूद केलेले आहे, दुसरे कागदपत्र म्हणजे, सरकारी अभियोक्ता यांचा तथाकथित अहवाल, जो अर्जाच्या स्वरुपामध्ये दाखल करण्यात आला आहे, त्यामध्ये एकच निवेदन पुन्हा पुन्हा करण्यात आले आहे, ते म्हणजे तपासी अधिकारी हे न्यायालयासमोर (विनंती घेऊन) येत आहेत. दुस—या कागदपत्राच्या परिच्छेद क्रमांक १० मध्ये पुन्हा असे नमूद करण्यात आले आहे की, त्या सदर कागदपत्रामध्ये नमूद केलेल्या कारणांच्या आधारावर पुढील नव्वद (९०) दिवसांचा वेळ वाढवून मिळण्याकामी तपासी प्राधिकारी ह्यांनी न्यायालयाकडे अर्ज केला होता आणि सदर न्यायचौकशी न्यायालयाने देखील प्रश्नांकित कागदपत्र हा तपासी अधिका—याने दाखल केलेला अर्ज अशी त्यांची संभावना केलेली होती. सरकारी अभियोक्ता यांच्याकडून योग्य त्या पृष्ठांकनाच्या स्वरुपामधील स्पष्टपणा, जसे, तपासी अधिकारी यांच्या त्यापूर्वी सादर केलेल्या अर्जातील कारणांचे अवलोकन केलेले होते. आणि त्यामुळे त्यांचे समाधान झाले होते की, तपास पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा वाढवून मिळण्यासाठीची सत्यता (तपास अधिकारी यांच्याकडून) पटवून देण्यात आली होती त्यामुळे अशा प्रकारचा विवाद टाळता आला असता, परंतु तसे झालेले नाही.

३६) अशा कालावधी वाढवून मिळण्याबाबच्या कारणांच्या अस्तित्वाचा विचार करता, आम्हाला असे आढळून आले आहे की, अशी कारणे वर नमूद सविस्तर कारणांबाबत जी चर्चा करण्यात आली आहे, त्यामध्ये अस्तित्वात आहेत. पहिले कागदपत्र, हा तपासी अधिकारी यांचा तथाकथित अर्ज आहे, ज्यामध्ये तपासासाठीचा कालावधी वाढवून मिळण्याबाबतची कारणे नमूद केलेली आहेत, परंतू दुस—या कागदपत्रांमध्ये ती विस्ताराने नमूद केलेली आहेत, आणि असे म्हणता येत नाही की, पहिल्या कागदपत्रामध्ये जे काही नमूद केलेले आहे. ते आणि त्याचीच पुनरावृत्ती (दुस—या कागदपत्रांमध्ये) केली आहे. त्यामुळे, म्हणून, असे म्हणता येत नाही की सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या सारासार बुध्दीचा

कोठेही वापर केल्याचे दिसत नाही.

३७) अपीलकर्ता/राज्य यांच्यावतीने बाजू मांडणा–या विद्वान वरिष्ठ वकिलांच्या युक्तिवादामध्ये गुणवत्ता आहे ती ही की, नमुन्यापेक्षा (प्रकरणाच्या) सारांशामध्ये जास्त महत्व आहे, ज्यावर **हितेंद्र विष्णू ठाकूर**[7] हया प्रकरणामध्ये देखील जास्त महत्व देण्यात आले आहे आणि ज्या प्रकरणावर प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पक्षकारांच्या वकिलांनी आधार घेतलेला आहे. अर्जाच्या स्वरुपामध्ये असणारे दुसरे कागदपत्र हे त्याचदिवशी दाखल करण्यात आले आहे. ही बाब अशी नाही की, तपासी अधिका–यांचा अर्ज, जे की पहिले कागदपत्र होते, ते माघारी घेतल्यामुळे दुसरे कागदपत्र, जे सरकारी अभियोक्ता यांचा तथाकथित अहवाल आहे, ते सादर करण्यात आले. या बाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, जरी दोन्ही कागदपत्रांवर सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे पृठांकन केलेले असले तरी पहिल्या कागदपत्रांतील मजकुराचे विश्लेषण झाल्यानंतरच दुसरे कागदपत्र सादर करण्यात आले. सदर दुस–या अर्जामध्ये तपासामध्ये झालेल्या प्रगतीबाबत विधाने करण्यात आली आहेत आणि आमच्यासमोर जे प्रत्युत्तर (रिजॉयन्डर) दाखल करण्यात आले आहे, त्यामुधून असे स्पष्ट होते की सरकारी अभियोक्ता यांना सदर कागदपत्रांची छानने करण्याची संधी प्राप्त झाली होती (आणि) दुस–या कागदपत्रांमध्ये जादा आणि विस्तारित करणे नमूद केलेली आहेत.

३८) अपीलकर्ता/राज्य यांच्या वतीने बाजू मांडणा–या विद्वान वरिष्ठ वकील श्री. मुकूल रोहतगी यांनी उचित युक्तिवाद केला आहे की, प्रस्तुत प्रकरण आणि **हितेंद्र विष्णू ठाकूर**[8] प्रकरणातील वस्तुस्थितीमध्ये महत्वाचा फरक आहे. कारण त्या प्रकरणामध्ये दाखल करण्यात आलेला अर्ज हा तपासी अधिका–याच्या शपथपत्राच्या स्वरुपात होता, ज्याच्या स्वाक्ष–यांची ओळख सरकारी अभियोक्ता यांनी पृष्ठांकन नोंदवून पटविली होती. आणि, त्या परिस्थितीमध्ये, शपथपत्रकर्त्याच्या स्वाक्षरीची सरकारी अभियोक्ता यांनी केवळ ओळख पटवणे ही बाब तो अर्ज सरकारी अभियोक्ता यांचा अहवाल असल्याचे समजण्यात यावे, याचे समर्थन करीत नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये दुस–या कागदपत्रावर सरकारी अभियोक्ता यांनी सुस्पष्टपणे पृष्ठांकन केलेले आहे जे त्या कागदपत्रामध्ये नमूद केलेल्या विधानांची पुष्टी करते.

३९) यामध्ये शंका नाही की, **हितेंद्र विष्णू ठाकूर**[9] प्रकरणातील (न्यायनिर्णयाच्या) २३ व्या

परिच्छेदामध्ये, ह्या न्यायालयाने सरकारी अभियोक्ता यांच्याकडून (अर्जाची) छाननी होण्याच्या महत्वावर जोर दिला आहे, यामागचे कारण असे की एक स्थानबध्दास, तपासी पोलिस अधिका—याच्या ताब्यामध्ये, एक पोलिस अधिकारी, म्हणून सुपूर्द होऊ दिला जाणार नाही. अशा प्रकारे, सरकारी अभियोक्ता यांच्याकडे तपासी अधिका—याने कालावधी वाढवून मागण्यासाठी सादर केलेल्या कारणांना संमती दयावी अथवा न दयावी हा पर्याय उपलब्ध आहे, परंतु हया प्रकरणातील घटनांचा विचार करता, अर्जाच्या स्वरुपातील दुसरे कागदपत्र हे दर्शविते की पहिल्या कागदपत्रांतील निवेदनांची छाननी करण्यात आली व त्यानंतरच तपास पूर्ण करण्यासाठी वेळ वाढवून मागण्यासाठी आवश्यक असलेले सविस्तर मुद्दे आणि विस्तारित कारणे नमूद करण्यात आली आहेत.

४०) नि:संशयपणे, वेळ वाढवून मिळण्यासाठी तपासी अधिकारी यांनी केलेली विनंती सरकारी अभियोक्ता यांच्या अहवालाची जागा घेऊ शकत नाही, पण ज्याअर्थी दोन्ही कागदपत्रांची तुलना करता, आमच्या असे निदर्शनास आले आहे की, सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या सारासार बुध्दीचा वापर केलेला आहे तसेच पृष्ठांकनही केलेले आहे, त्यामुळे जेव्हा प्रत्यक्षात सारासार बुध्दीचा वापर करण्यात आलेला आहे तेव्हा हया प्रकारच्या उणीवेमुळे उत्तरवादींना नियमित (डिफॉल्ट) जामिनाचा लाभ घेण्याचा हक्क मिळता कामा नये. ती सविस्तर कारणे ही निश्चितपणे **संजय केडिया**[10] हया प्रकरणामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या "आवश्यक कारणे" (कंपेलिंग रिझन्स) हया प्रवर्गामध्ये मोडतात.

४१) आम्ही, त्यामुळे, मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांशी त्यांच्या आव्हानित आदेशामध्ये जे निष्कर्ष काढले आहेत त्यांच्याशी संमत व्हावे हे आमच्या मनाला पटवून देण्यास असमर्थ आहोत आणि त्यामुळे आम्ही असा निर्णय देतो की, उत्तरवादी हे नियमित जामिन मिळवण्यास पात्र नाहीत आणि परिणामस्वरुप, सदर आव्हानित आदेश रद्द करीत आहोत.

४२) तरी देखील, दोषारोप पत्र दाखल झालेले असल्याने, आम्ही या ठिकाणी जी अभीक्षणे नोंदविली आहेत, ती, कोणत्याही प्रकारे, उत्तरवादी यांनी न्यायचौकशी न्यायालयाकडून नियमित जामिनाची मागणी करण्याच्या त्यांच्या हक्काला , जर त्यांना तसा सल्ला दिला गेला तर, ज्यावर न्यायचौकशी न्यायालयाकडून त्यातील गुणवत्तेवर निर्णय दिला जाणार असेल, त्याला बाधा आणणार नाहीत.

४३) अपील मंजूर करण्यात येत असून, पक्षकारांनी त्यांचा–त्यांचा खर्च सोसावा.

..... भारताचे मुख्य न्यायमूर्ती
(रंजन गोगोई)

..... न्यायमूर्ती
(एल्. नागेश्वर राव)

..... न्यायमूर्ती
(संजय किशन कौल).

नवी दिल्ली,
फेब्रुवारी १३,२०१९

नकार (डिस्क्लेमर)

" हया न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहरिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."

xxx xxx

Chief Translator and)
Interpreter's Office)
High Court, Bombay.)
2019)

SCEM-6

A True Translation,

Translator.